# चैतन्य लहरी

मार्च/एप्रिल २००५

अंक क्रमांक ३/४



# वाढदिवस पूजा





## अनुक्रमणिका


- .......घे दान सुटे गिराण ------------------------------------ २
- श्रीमाताजींचा विवाह वाढदिवस समारंभ, प्रतिष्ठान पुणे. ७.४.२००५ (वृत्तांत) ३
- वाढदिवस पूजा, गुढीपाडवा पूजा, होळी पूजा, प्रतिष्ठान २००५ (वृत्तांत) -- ४
- पुन: प्रक्षेपण ------------------------------------ ५
- अमृतवाणी . ------------------------------------ ६
- श्रीसूक्त ------------------------------------ ७
- सर.सी.पी.श्रीवास्तवसाहेब यांचे भाषण २० मार्च २००५, बालेवाडी पुणे ---- ८
- प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचा सहजयोग्यांना उपदेश.फेबुवारी १९८७------ ९
- शिवपूजा १२/१३ मार्च ,२००५ बालेवाडी, पुणे -वृत्तांत ------------ १२
- वाढदिवस पूजा, बालेवाडी, पुणे (वृत्तांत) -------------------- १४


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी व युवादृष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इंन्फ़ोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणें'' या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इंन्फ़ोसिस्टीमस ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगीशिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील. तसेच चैतन्य लहरी मासिकाचे नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,
KOTHRUD,PUNE 411 029. TEL. 020 25286537

## ....घे दान सुटे गिराण

आजकालची राजकीय, सामाजिक, आर्थिक, शौक्षणिक व नैतिक दुरवस्था झालेली परिस्थिति अनेक गैरप्रकारांमधून व उद्विग्न करणाऱ्या घटनांमधून संवेदनशील मनोवृत्तीला जाणवल्याशिवाय रहात नाहीं. अर्थात कुठेंच कांहीं चांगले दृष्टीस पडत नाहीं. असे नाही; या मन:स्तापाबरोबरच सुखद आशा निर्माण करणाऱ्या घटना व माणसे दिसून येतात आणि त्यांचे विचार व कार्य पाहिले की आशेचा एक किरण नजरेस पडतो. पण त्यांचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळें त्यांचा प्रत्यक्ष प्रभाव एकूण समाजमानसावर कितपत केव्हां व कसा होणार हा विचार मनाला अस्वस्थ करत राहतो. म्हणूनच सध्यां कलियुग आहे असें म्हणतात आणि म्हणूनच आदिशक्तीचे अवतरण अशा प.पू.श्रीमाताजी आपल्यासमक्ष आहेत, हे आपले किती परम भाग्य आहे हे समजते. श्रीमाताजींनी मानवप्रकृतीलाच स्पर्श केला आहे व मानवामधें अंतरंगामधून कायापालट करण्यासाठीं जगभर सहजयोग सुरु केला आहे. आणि म्हणूनच त्याच्या या महान कार्याचे पाईक म्हणून आपणा सर्वांची जबाबदारी फार मोठी आहे. माणसामधें संपूर्ण परिवर्तन घडून त्याच्या ह्रदयांत प्रेम व करुणा जागृत झाल्याशिवाय त्याच्या समस्या संपणार नाहींत. हा आवाका प्रचंड आहे व आपण सर्वस्वानें या कार्याला वाहून घेतल्याशिवाय हे संभव नाहीं. त्यासाठी लागणारी सर्व शक्ति मिळवण्याचा ध्यास व जिद्द आपण बाळगली पाहिजे. वृक्ष मोठा होतो तेव्हां आधीं त्याची मुळे खोलवर जातात, जीवनरस मिळवतात व त्यांतून वृक्षाच्या फांद्या बाजूला पसरतात. अशा वृक्षाच्या छायेतच मग माणसे विसाव्यासाठीं येतात. सहजयोग्यांची वाढही अशीच झाली पाहिजे असे श्रीमाताजींनी सांगितले आहेच. ही स्थिति मिळवण्याचा प्रयत्न आपण सातत्याने करूं या व त्यासाठींच शक्ति मागू या. समस्त मानवजातीच्या कल्याणासाठीं आपण सर्वस्वाचे दान श्रीमाताजींच्या चरणीं ठेऊन

'' घे दान सुटे गिराण '' अशी मानवजातीला लागलेले हे ग्रहण सोडवण्याची प्रार्थना करूं या.

● ● ●

## श्रीमाताजींचा ५८ वा विवाह वाढदिवस समारंभ, प्रतिष्ठान पुणे. दिनांक ७.४.२००५

श्रीमाताजींच्या लग्नाच्या ५८ व्या वाढदिवसानिमित्त प्रतिष्ठानमध्ये कार्यक्रम आयोजित केला होता. प्रतिष्ठानमधील लॉनवर स्टेज उभारले होते. स्टेजच्या मागच्या बाजूला पाच पांढऱ्या घोड्याच्या रथात श्रीमाताजी व पापाजी बसलेले दाखविले होते. आकाशांतून देव- देवता फुले उधळीत असून रथाच्या पुढच्या बाजूला गणेश, राधा-कृष्ण नृत्य करीत चालले असल्याचा अतिशय सुंदर देखावा होता. लॉनच्या सर्व बाजूला सजावट केलेले खांब उभारून विद्युत रोषणाई केली होती. तसेच सिल्कच्या कापडाचा वापर करून श्रीमाताजींच्या येण्याच्या मार्गावर कमानी उभारल्या होत्या. बाजूला केटरींगची व्यवस्था केली होती.

साधारण ९:३० च्या सुमारास श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले . त्यांच्यासोबत पापाजी, कल्पनादीदी, साधनादीदी होत्या. श्रीमाताजींच्या चरणावर सर्व जगातील सहजयोग्यांच्या वतीने पुष्पमाला अर्पण करण्यात आली. प्रथम मीना फातरपेकर यांनी, '' माता दुर्गा भवानी '' हे अत्यंत हृदयातून भजन सादर करून कार्यक्रमाची सुरूवात केली. त्यानंतर श्रीमाताजींच्या - पापाजींच्या समोर तपकिरी रंगाचा सुंदर केक ठेवण्यात आला. श्रीमाताजींनी व पापाजींनी प्रचंड टाळ्यांच्या आवाजात केक कापला. पापाजींनी श्रीमाताजींना केक भरवला, श्रीमाताजींनी व पापाजीनी एकमेकांना केक भरवला. त्यानंतर हैद्राबादचे कव्वाल स्टेजवर आले. त्यांनी सुरूवातीला '' मुझे क्या गम है मेरी माता सामने है '' ही कव्वाली सादर केली. त्यानंतर होळीवर आधारीत ''होली खेलोगे तुम्हारे घर'' हे भजन सादर करून कार्यक्रम संपवला. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर दिल्लीचे श्री राजीव, कलेक्टर श्री गौतम, तसेच नलगीरकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पापाजींनीही छोटेसे भाषण केले. त्यानंतर वाढदिवस साजरा करण्यास श्रीमाताजींनी परवानगी दिल्याबद्दल श्री राजेंद्र पुगालिया यांनी आभार मानले.

शेवटी श्रीमाताजींच्यासमवेत कल्पनादीदी, साधनादीदी यांचे तसेच जमलेल्या सर्व निमंत्रितांचे फोटो काढण्यात आल्यानंतर आदिशक्ती आपल्या निवासस्थानी परतल्या. त्यावेळी रात्रीचे साधारण १२:०० वाजले होते. त्यानंतर जमलेल्या सर्व निमंत्रितांनी प्रसाद घेतला.

## सर सी. पी. श्रीवास्तव साहेबांचे भाषण (संक्षिप्त)

अशा प्रसंगी बोलणे तसे अवघड आहे पण बोलण्यासारखे खूप आहे. माझ्या शेजारी ह्या बसलेल्या आहेत. आज मला दिनांक ७ एप्रिल, १९४७ हा आमच्या लग्नाचा दिवस आठवत आहे. आमच्या लग्नाला आज ५८ वर्षे पूर्ण होत आहेत. सर्वात प्रथम तिने मला दोन मूर्ति(कल्पनादिदि व साधनादिदि) प्रेझेंट दिल्या असून त्या आपल्यासमोर आहेत. त्यानंतर तिने जगभर हजारो मूर्ति तयार केल्या असून त्यातील काही समोर आहेत. आपण सर्वजण त्यांची मुले आहोत. सरूवातीपासून मी त्यांच्याबरोबर राहून पहात आहे, त्यांनी सर्वांवर एकसारखेच प्रेम केले आहे. त्यांच्या प्रेमाला अंत नाही हे मी पहात आलो आहे.

या प्रसंगी मी एकदोन गोष्टी सांगू इच्छितो, माझे जर ह्यांच्याशी लग्न झाले नसते तर मी आज इथे नसतो. मी जो जिवंत आहे ते फक्त ह्यांच्यामुळेच. त्यांनी मला सतत साथ व प्रेम देऊन प्रत्येक गोष्टीत त्या माझ्या पाठीशी उभ्या राहिल्या आहेत.हे सर्व त्यांना कसे जमते ते मला समजत नाही. ती सर्व जगातील सहजयोग्यांकडे लक्ष देते तसेच आमच्याकडेही लक्ष देते. मला असे वाटते की त्या सर्व प्रेम मला देत आहेत तर आपणा सर्वांना असे वाटते की त्या सर्व प्रेम तुम्हाला देत आहेत. हे असेच चालू रहावे असे मला वाटते.

त्या अशाच राहू द्या. आपण सर्वजण आपली मुले, त्यांची मुले, असे सर्वजण इथे येऊन त्यांचा वाढदिवस साजरा करावा अशी मी परमेश्वराकडे प्रार्थन करतो. आजचा संगीताचा कार्यक्रम खूप चांगला झाला आहे. मीना फातरफेकर चांगल्या गायल्या. तसेच कव्वाल यांनी चांगली कव्वाली सादर केली. मला परत त्यांची कव्वाली ऐकायला आवडेल. सर्वांना श्रीमाताजींच्या कृपेत सुखसमाधान लाभो.

## वाढदिवस पूजा प्रतिष्ठान २० मार्च २००५

आज रात्री १२ वाजता आदिशक्तीचा वाढदिवस सुरू होणार असल्याने प्रतिष्ठानमध्ये सजावट केली होती. सर्वत्र फुगे, फुलांच्या माळा, अनेक प्रकारचे बुके ठेवले होते. श्रीमाताजींच्या निवास कक्षात सर्वत्र फुगे, फुलांच्या माळा, तसेच हॅपी बर्थ डे नावाची आकर्षक अक्षरे लावली होती. बाहेरच्या बाजूला सगळीकडे रांगोळ्या काढल्या होत्या. संपूर्ण प्रतिष्ठानला दिव्यांची रोषणाई केली होती.त्यामुळे साक्षात स्वर्ग पृथ्वीवर साकार झाल्याचा भास होत होता.साधारण ११:४५ च्या सुमारास मुख्य स्टेडियममधील कार्यक्रम संपवून कल्पनादीदी, साधनादीदी, साळवीसाहेब, नात जावई श्री हेम साहेब व नात अनुपमादीदी यांचे प्रतिष्ठानमध्ये आगमन झाले. त्यांच्यासोबत जगातील लिडर्स व पाहुणे मंडळी आली होती. श्रीमाताजींच्या आरामकक्षात श्रीमाताजी व पापाजी कोचावर बसलेले होते. श्रीमाताजी अत्यंत प्रसन्न व आनंदी दिसत होत्या. श्री राजेंद्र पुगालिया व श्री नलगीरकर यांनी श्रीमाताजींच्या चरणावर सर्व जगातील सहजयोग्यांच्या वतीने पुष्पहार अर्पण केला. त्यावेळी रात्रीचे १२:०० वाजून गेले होते.त्यानंतर पांढऱ्या रंगाचा अत्यंत सुंदर केक श्रीमाताजींच्या समोर मांडण्यात आला. सर्वजण "हॅपी बर्थ डे टू श्रीमाताजी" हे गीत म्हणत असताना टाळ्यांच्या आवाजात श्रीमाताजींनी पापाजींच्या मदतीने केक कापला. पापाजींनी श्रीमाताजींना केक भरवला. त्यानंतर दुसरा मोठा चॉकलेट केक समोर ठेवण्यात आला. तो केक कापल्यानंतर पापाजींनी एक केक कापला.

त्यावेळी तुम जिओ हजारो साल, बार बार ये दिन आये, ही गाणी सर्वजण म्हणत होते. त्यानंतर श्री राजेंद्र पुगालिया यांनी श्रीमाताजींना साडी अर्पण केली.त्यानंतर जगातील लिडर्सनी श्रीमाताजींच्या चरणावर बुके अर्पण केले. त्यावेळी साधनादीदींनी सुचविल्यानुसार, फ्रेंच, जर्मन, इटालीयन, जपानी, ऑस्ट्रेलियन भाषेत हॅपी बर्थ डे गीत म्हटले. त्यानंतर श्रीमाताजींच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींनी श्रीमाताजींना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनतर सर्व कुटुंबीयांनी केकचा महाप्रसाद घेतला.त्यानंतर श्रीपुगालिया यांच्या मदतीने श्रीमाताजींच्या हस्ते तसेच कल्पनादीदींच्या हस्ते प्रतिष्ठानमधील सहकाऱ्यांना प्रेझेंट देण्यात आली.आज प्रतिष्ठानमध्ये उपस्थित असलेल्या सर्वांना साक्षात स्वर्गात आल्यासारखे जाणवत होते. सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते.

## गुढीपाडवा पूजा प्रतिष्ठान, पुणे, दिनांक ९ एप्रिल २००५

आज गुढीपाडव्या निमित्त प्रतिष्ठानावर श्रीमाताजींची पूजा संपन्न झाली. ८:३० च्या सुमारास प्रतिष्ठान मधील श्रीमाताजींच्या आरामकक्षात श्री राजेंद्र पुगालिया व श्री पराग राजे यांनी श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण केला. श्रीमाताजीं कोचावर बसलेल्या होत्या. त्यांच्या बाजूला पापाजी बसले होते. फुलांनी सजविलेल्या चांदीच्या तबकात श्रीमाताजींनी आपले चरण ठेवले होते. त्यानंतर श्री पुगालिया यांनी सर्व सहजयोग्यांच्या वतीने श्रीमाताजींना साडी व ओटी अर्पण केली. श्रीमाताजींना श्री पराग राजे यांनी सर्व सहजयोग्यांच्या वतीने भेट अर्पण केली. त्यानंतर एक फळांनी भरलेली परडी जिच्या वरच्या बाजूला आकर्षक गुढ्या उभारलेल्या होत्या अशी परडी श्रीमाताजींच्या चरणासमोर ठेवली. त्यावेळी श्रीमाताजींनी सर्वांना गुढीपाडव्याचे अनंत आशीर्वाद दिले. श्रीमाताजींना प्रतिष्ठानमधील युवाशक्तीच्या वतीने रजई प्रेझेंट दिली. शेवटी श्रीमाताजींनी महाप्रसादाच्या नैवेद्याचा स्वीकार केला. आज श्रीमाताजी खूपच प्रसन्न व आनंदी होत्या.

## होळी -प्रतिष्ठान पुणे, दिनांक २५ मार्च २००५

संध्याकाळी ७:३० च्या सुमारास श्रीमाताजींच्या आरामकक्षात श्री राजेंद्र पुगालिया आणि डॉ उदवाणी, अमरावती यांनी श्रीमाताजींच्या चरणावर गुलाबपुष्पांची माळा अर्पण केली. त्यावेळी श्रीमाताजींच्या बाजूला पापाजी तसेच कल्पनादीदी व पी.के. साहेब बसले होते. त्यानंतर चांदीच्या तबकात चांदीच्या वाटयांमधे अनेक रंग ठेवलेले तबक श्रीमाताजींच्या पुढे सादर केले. त्यावेळी श्रीमाताजींनी त्यातील रंग आपल्या हाताने व्हायब्रेट केले. त्यातील गुलाबी रंग श्रीमाताजींनी हाताला लावला आणि होळी साजरी केली. श्रीमाताजींनी सर्वांना अनंत आशीर्वाद दिले.

# पुन: प्रक्षेपण

(अनुभवलेल्या, ऐकलेल्या, वाचलेल्या अनेक गोष्टी स्मृति-पटलावर कधीं कधीं कायमच्या टिकून रहात नाहीत. कोणत्या ना कोणत्या निमित्तानें त्या अचानक खोलवरुन, जाग्याही होतात. प.पू. श्रीमाताजींनी अवतरण व देव-देवतांबद्दल तसेच सहजयोगाबद्दल केलेली प्रवचनें हे एक सहजयोग्यांसाठी अनमोल धन आहे. त्या उपदेशाची जाणीव जागृत रहावी या सीमित उद्देशाने त्यांच्या वेगवेगळ्या प्रवचनांतील संक्षिप्त अंश या सदरामधून पुन्हा प्रसिद्ध करणें सहजयोग्यांसाठी उपयुक्त ठरेल या भावनेने हे सदर सुरु करीत आहोंत. परमचैतन्याच्या इच्छेनुसारच हा प्रयत्न फलदायी होवो एवढीच श्रीमाताजींच्या चरणी प्रार्थना आहे.)

## रामनवमी पूजा,: २५ मार्च १९९१

....श्रीराम हे आपल्या अनाहत चक्रावरील फार महत्त्वाचे दैवत आहे. हृदयांत प्रेम व कर्तव्यपरायणता कमी असते तेव्हा या चक्रावर पकड येते. श्रीराम हे एक परिपूर्ण मानवस्वरूपातील अवतरण होते. ते पुरुषोत्तम होते. त्यांचे चारित्र्य अत्यंत शुद्ध व स्वच्छ होते. प्रजेचे हित कशात आहे याचाच त्यांनी विचार केला, त्याचबरोबर पुत्र, पती, बंधू या सर्व संबंधामध्यें आदर्श दाखवून दिला, सर्व बाबतीत धर्माचेच आदर्श दाखवले. आजकालच्या आपल्या देशांतील परिस्थितीमध्ये याची फारच आवश्यकता आहे; नुसती मोठमोठ्याने भजने गाऊन, घोषणा करून वा मंदिर बांधून हे होणार नाही. त्यासाठी श्रीरामशक्तीचा प्रकाश आपल्या चित्तामध्ये आला पाहिजे. सहजयोग्यांनी हाच प्रयत्न केला पाहिजे, त्यांनाच ते शक्य आहे. श्रीरामांचे आदर्श आपल्या हृदयांत रुजवले तर आजकालचे सर्व गलिच्छ राजकारण व लोकांचे त्रास दूर होणार आहेत. राज्य करतांनाही श्रीराम निष्काम व निरासक्त राहिले. म्हणून श्रीरामांचा आदर्श जीवनाच्या सर्व क्षेत्रांमधें आणण्याचा प्रयत्न करा. ....आपल्याच चित्तावर नियंत्रण ठेवा. भिरभिरणारी नजर हे अस्थिर चित्ताचे लक्षण आहे....श्रीरामांच्या आदर्शाचा आविष्कार तुमच्या जीवनामधून प्रगट व्हायला हवा.....श्रीरामांच्या जीवनकर्तृत्वामागे सीतादेवीची Potential शक्ती होती. तिच्यामध्ये पूर्णत्वाने कार्यान्वित झाल्याने सर्व संकटकालांत पत्नी व माता या आदर्श धर्माचे ती पूर्णपणे पालन करत होती. सहजयोगिनींनीं हे विशेष करून लक्षांत ठेवावे. ...क्षमा व प्रेम हे गुण मिळवले तर हे अशक्य नाहीं..... त्याचप्रमाणें श्री हनुमानांचा समर्पित व तत्पर दासधर्माचा गुणही आत्मसात केला पाहिजे. ...श्रीराम जागृत राहिले तर तुमचे सर्व विचार व सवयी यामध्ये खूप परिवर्तन घडेल. विश्वधर्माचे आदर्श असे सहजयोगी बनण्याचा प्रयत्न सर्वांनी करावा.....

## विश्वनिर्मल धर्माची संस्कृती- ७ फेब्रुवारी,८५

......विश्वनिर्मल धर्माचा गाभा हा '' शांती '' आहे; ही शांती तुमच्या अंतरंगात प्रथम पूर्णपणें प्रस्थापित झाली पाहिजे. अंतरंगातील शांती बोलून दाखवतां येत नसते. तसे करणें म्हणजे अहंकारामधून स्वत:चीच फसवणूक करणें आहे. ती आपली आपल्यालाच आंतमधून मिळवायची असते, त्यासाठीं प्रयत्न करायचा असतो. तुमच्या डोक्यांत जे कांहीं चालते त्याचाच परिणाम बाहेर दिसून येतो. मी जे कांहीं सांगते तो एक मंत्रच असतो, त्याचा अर्थ तुमच्या आंतमध्ये खोलवर शिरल्याचे तुम्हांला समजले पाहिजे.त्यासाठीच 'आंत' मध्ये तुम्ही शांत असले पाहिजे. तसे असाल तरच जे कांही तुमच्या कल्याणासाठीं व प्रगल्भतेसाठी असते ते आंतपर्यंत रुजते......कांहीं नवीन सहजयोग्यांनाही सहजयोगाबद्दल, ध्यानाबद्दल, बाधांबद्दल बोलण्याची संवय असते. हे अगदीं चूक आहे. तुमची सर्व स्थिति तुमचे व्यक्तिमत्त्व, स्वभाव, वागणूक इ.मधून आपोआप दुसऱ्याला जाणवली पाहिजे. वृक्ष मोठा वाढला की लोक आपोआप त्याच्या छायेखाली येतात. तसे हे झाले पाहिजे.....तुम्हाला आजूबाजूला शांती निर्माण करायची आहे; म्हणून तुमच्या छोटया -छोट्या वागण्याबोलण्यावरून, भाषेवरून , विचारांमधून, संवयीमधून, आवडी-निवडी मधून अशा सर्व प्रकारे ती दुसऱ्यांना जाणवली पाहिजे..... त्यासाठी एक म्हणजे सतत सुंदर व मंगल गोष्टींकडे चित्त द्या. मुले, फुले, यांच्याकडे बघा, तुम्हाला लाभलेले आशीर्वाद आठवा.... त्याचप्रमाणें आनंदाचे क्षण आठवा. आंतमधला आनंद सुख-शांती पसरवणारा असतो. असे झाले पाहिजे. मग छोट्या-मोठया तक्रारी, कुरबुरी पळून जातात. संत असे असतात.

# अमृतवाणी

प.पू. श्रीमाताजींनी वेळोवेळी केलेल्या उपदेशांमधील अमृतकण

- ......आत्मसाक्षात्कारानंतर तुम्हाला भगवान शंकराचे ज्ञान होते कारण आपला आत्मा प्रकाशित झाल्यानंतर चित्त सहस्रारांत श्रीसदाशिवांच्या चरणी लीन व एकाग्र होते. (उपदेश - १९९३)
- ....तुमच्या स्वत:च्या आत्मपरीक्षणासाठीं तुमच्यामध्ये शिव -तत्त्व, त्यांची निरागसता, भोळेपणा व अबोधितता- प्रस्थापित होणें आवश्यक आहे. (शिव पूजा : १९९३)
- .....आत्मसाक्षात्कारानंतर आणि सहस्रार उघडल्यानंतर तुम्हाला आणखी चार चक्रांमधून पार व्हायचे आहे- अर्धबिंदू, बिंदू, वलय आणि प्रदक्षिणा ही चक्रे पार केल्यानंतर तुम्ही स्वत:ला सहजयोगी म्हणू शकता. (सहस्रार पूजा:१९८३)
- ......तुमच्या या आयुष्यामध्येच उत्थानासाठीं तुम्हाला सात चक्रांच्या आणि त्या पुढच्या आणखी दोन चक्रांच्या म्हणजे नऊ चक्रांच्या पार व्हायचे आहे आणि तेच तुमचे अंतिम साध्य आहे. (नवरात्री पूजा १९८८)
- .... ध्यान केल्यास प्रगती चांगली होते. मंत्र यांत्रिकपणे म्हटले जाऊं नयेत; हृदयापासून त्याचे उच्चारण व्हावे, भावपूर्णपणें उच्चारावेत. (दिवाळीपूजा १९९३)
- ....सहजयोगी ही व्यक्ती कुण्डलिनीमधून आत्मसाक्षात्कार मिळालेली व्यक्ती असते व कुण्डलिनी तुमचे संगोपन क रणारी आहे. आई मुलाची काळजी घेते. त्याला प्रेम देते पण त्याच्याशी तडजोड करत नाही. (दिवाळी पूजा १९९३)
- .... ज्या दिवशी सहजयोगी आदर्श होऊन अलंकाराप्रमाणें चमकतील ते दिवस यायला हवेत. सर्व सहजयोगी अशाप्रकारे तयार झाल्याचे दिवस मला पहायचे आहेत. (दिवाळी पूजा १९९३)
- .....अस्वस्थ करणाऱ्या ज्या गोष्टी तुम्ही अनुभवता त्या सर्व माया आहेत हे जेव्हा कळेल त्यावेळी तुम्ही चित्तावर प्रभुत्व मिळवाल. (ललिता-श्रीचक्र पूजा १९९०)


Certificate of Special Congressional Recognition

Presented to


Shri Mataji

In celebration of your 82nd birthday and in recognition of you many outstanding contributions and accomplishments

March 21, 2005
DATE

MEMBER OF CONGRESS

# श्रीसूक्त



अंक क्र १/२ वरून पुढे

आदित्यवर्णे तपसोधिजातो वनस्पतिस्तव वृक्षो S थ बिल्वः ।
तस्य फलानि तपसा नुदन्तु मायान्तरायाश्च बाह्या अलक्ष्मी : ॥६ ॥

विवरण :-जिचे मुखमण्डल अरुणवर्णाने शोभत आहे; अश्या लक्ष्मीमातेने तपश्चर्येने बिल्ववृक्षाची निर्मिती केली. म्हणूनच बिल्ववृक्षाला '' श्रीवृक्ष '' असेही म्हणतात. या बिल्वफळाच्या सेवनाने अंतर्बाह्य शुद्धी होते. बिल्ववृक्षाच्या त्रिदलसेवनाने त्रिविध ताप पूर्ण नाहीसे होतात. म्हणूनच बिल्ववृक्षाला आयुर्वेदात महत्त्वाचे स्थान दिले आहे.

हे लक्ष्मीमाते, आम्ही अज्ञानी आहोत. ह्या अज्ञानातून पातके निर्माण होतात. आमच्यातील अकार्यक्षमतेमुळे मानसिक व भौतिक दारिद्रय निर्माण होते. या सर्व गोष्टींनाच अलक्ष्मी असे म्हटले आहे.
श्रीलक्ष्मीमातेने निर्माण केलेल्या या बिल्ववृक्षातून वातावरणात सोडल्या जाणाऱ्या द्रव्यांचा मानवी शरीरावर विलक्षण चांगला परिणाम होत असतो. आपल्या शरीरातील रोमरंध्रांतूनही हा प्रवाह आत जाऊन अंतर्बाह्य शुद्धी होत असते. हा प्रवाह म्हणजे दुसरे तिसरे काही नसून परमचैतन्यच होय.

तेव्हा, <u>श्रीमाताजी, असे हे परमचैतन्य आम्हा सर्वांच्या रोमरंध्रांतून शोषले जाऊन आमच्यातील अलक्ष्मी दूर होऊ दे.</u>

उपैतु मां देवसखः कीर्तिश्च मणिना सह ।
प्रादुर्भूतो S स्मि राष्ट्रे s स्मिन् कीर्तिमृद्धिं ददातु मे ॥ ७ ॥

विवरण :- हे लक्ष्मीमाते, महादेवांचा मित्र म्हणून प्रसिद्ध असलेला कुबेर मला प्रसन्न होऊ दे. कुबेर यश, कीर्ती, समृद्धी देतो. म्हणजे याचाच अर्थ, दैवी शक्ती जर पाठीशी असेल तर कोणत्याही चांगल्या कार्यात आपल्याला यश येते, व आलेले यश हे चिरकाल टिकते. म्हणून हे लक्ष्मीमाते, तू आम्हाला दैवी शक्तीने संपन्न कर.

भारतासारख्या श्रेष्ठ, पावन अश्या योगभूमीत आम्ही जन्माला आलो आहोत. म्हणून तू आम्हाला आध्यात्मिक समृद्धी दे. अशी प्रार्थना या मंत्रामध्ये ऋषींनी केली आहे.

<u>ही प्रार्थना आपल्या सर्वांच्या माउलीने ऐकली आणि आध्यात्मिक समृद्धीच्या ज्योतींचा प्रकाश केवळ भारतापुरताच सीमित न ठेवता सारे विश्वच या प्रकाशाने उजळून निघाले</u>. हा प्रेमाचा प्रकाश सतत वाटण्याची शुद्ध इच्छा आम्हां सर्व सहजयोग्यांना होऊ दे हीच श्रीमाताजींच्या चरणी नम्र प्रार्थना !

क्षुत्पिपासामलां ज्येष्ठामलक्ष्मीं नाशयाम्यहम् ।
अभूतिमसमृद्धिंच सर्वां निर्णुद मे गृहात् ॥ ८ ॥

विवरण : - हे लक्ष्मीमाते, आमच्या घरातील सर्व प्रकारची अवकळा, दारिद्रय, निरुत्साह यांनी युक्त असलेली जी असमृद्धी आहे ती नाहीशी होऊ दे.

सर्व सुखं असतानाही अनेक घरांमधून मानसिक असंतोष असतो. हे औदासीन्य, निरुत्साह म्हणजे अभूति होय. कितीही मिळाले तरी समाधानी वृत्ती नसेल, तर दुःख वाटयास येते. म्हणूनच अशी जी अतृप्ती असते ती आमच्या घरातून नाहीशी कर.

यासाठी, <u>श्रीमाताजी, आम्हा सर्वांमधील अतृप्ती, लालसा ही नष्ट होऊन आम्हा सर्वांची वृत्ति ही आपल्या परमकृपेत समाधानी होऊ दे.</u>

गन्धव्दारां दुराधर्षां नित्यपुष्टाम् करीषिणीम् ।
ईश्वरीं सर्वभूतानां तामिहोपह्वये श्रियम् ॥ ९ ॥

विवरण :- वरील श्लोकात पृथ्वीमातेला दिलेली विशेषणे सांगितली आहेत. गंधवती पृथ्वी-सुगंधाने ओळखू येणाऱ्या, धनधान्यांनी नेहमी पुष्ट असणाऱ्या, उदंड समृद्धी देणाऱ्या, संपूर्ण जगतितलावर सत्ता असणाऱ्या, अश्या या पृथ्वीरूप धारण केलेल्या लक्ष्मीमातेला आम्ही बोलवत आहोत.

सर्व सृष्टीचे नियमन करणाऱ्या,सर्व चराचरसृष्टीवरच जिची सत्ता आहे अश्या साक्षात आदिशक्तीनेच पृथ्वीचे रूप धारण केलेले आहे. आपल्याला जन्म तीच देते. आपल्या पालनपोषणासाठी आवश्यक असणारे सर्व तीच पुरवत असते. समृद्धी देणारी शक्तीही तीच. सर्व समृद्धी (आध्यात्मिक, भौतिक) जरी आली, तरी या सर्व गोष्टींचे नियंत्रण करणारी शक्तीही तीच. ही शक्ती म्हणजेच आपल्या सर्वांची आई आपण सर्व तिचीच लेकरे आहोत.

अश्या या <u>आपल्या सर्वांच्या आईच्या अंत:करणातून आपल्या लेकरांवर सतत निर्मलप्रेमरूपी वात्सल्याच्या धारांचा वर्षाव होत असतो</u>. ह्याची जाणीव आम्हा सर्व सहजयोग्यांना सदैव असू दे.

मनस: काममाकूतिं वाच: सत्यमशीमहि ।
पशूनां रूपमन्नस्य मयि श्री: श्रयतां यश: ॥१०॥

विवरण :- हे लक्ष्मीमाते, आमच्या मनातील शुद्ध इच्छा, चांगले संकल्प पूर्ण होवोत. आमची वाणी ही नेहमी सत्य व यथार्थ असू दे. आमच्या मनामध्ये कितीतरी विचार येत असतात, जे निरर्थक असतात. त्यांनी आमचे चित्त सतत भरकटत राहते. आमच्यातील कुविचार हे ज्ञानाग्नीने भस्मसात होऊ देत.

सत्य वाणी ही गंगाजलाप्रमाणे शुद्ध व पवित्र असते. यासाठी, जर आमच्या वाणीतून सत्य मंगल, पवित्र बोल आले तर श्रीलक्ष्मीमातेचे कृपाशीर्वाद आपोआपच मिळतील व यश समृद्धी, कीर्ती या गोष्टी चालूनच येतील.

म्हणूनच श्रीमाताजी, आम्हाला आपल्या परमकृपेत निर्विचारिता प्राप्त होऊ दे. म्हणजे आमच्या मुखातून बाहेर पडणारे बोल हे या त्रैलोक्यस्वामिनीच्या म्हणजेच आपल्या इच्छेनुसारच येतील व हे बोल <u>आपल्या इच्छेनुसार आल्याने ते सत्य, मंगल व पवित्रच असतील.</u>

क्रमशः

## सर.सी.पी.श्रीवास्तवसाहेब यांचे भाषण

२० मार्च २००५, बालेवाडी पुणे.

आजचा दिवस खूप महान आहे. तुमच्या श्रीमाताजींनी पृथ्वीवरील माणसांना आत्मसाक्षात्कार देऊन देवदूत बनविले असून आजच्या या शुभ प्रसंगी सर्वांना याठिकाणी एकत्र केले आहे. आपण सर्वजण आज श्रीमाताजींचा वाढदिवस साजरा करण्यासाठी एकत्र जमलो आहोत. श्रीमाताजींनी स्वर्गातून या पृथ्वीवर आपल्या सर्वांना देवदूत बनविण्यासाठी अवतार घेतला आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की, गेले ३५ वर्षे त्या बैलगाडी, आगगाडी, विमानातून प्रवास करून जगभरातील लोकांना आत्मसाक्षात्कार देत आहेत.

जगभरातून आपण श्रीमाताजींचा वाढदिवस साजरा करण्यासाठी एकत्र जमला आहात आजचा हा आनंदाचा क्षण आहे. श्रीमाताजी सर्वसहजयोग्यांवर तसेच कुटुंबीयांवर एकसारखेच प्रेम करतात. आज योगायोगाने माझा वाढदिवस आहे. जगात असलेल्या १५ अब्ज लोकांपैकी मी एक आहे. पण एकमेव महत्त्वाचा जन्म म्हणजे श्रीमाताजींचा वाढदिवस.

तुम्हा सर्वांच्या वतीने मी श्रीमाताजींना प्रार्थना करतो की, आपण या पृथ्वीवर सर्वांना देवदूत बनविण्यासाठी अवतार घेतला असून त्या कार्यात आपण यशस्वी झाला आहात. पण अजून आपले कार्य पूर्ण झालेले नसून अजून जगातील अनेकांना आत्मसाक्षात्कार देणे बाकी आहे. म्हणून जो पर्यंत पृथ्वीवरील सर्व मानव आत्मसाक्षात्कार घेऊन देवदूत बनत नाहीत, सर्व पृथ्वी स्वर्ग होत नाही तोपर्यंत आपले हे साकार रूपातील अस्तित्व आम्हासर्वांना हवे आहे.

जय श्री माताजी

# प्रतिष्ठान, २० मार्च २००५













# २१ मार्च २००५, बालेवाडी पुणे








# गुढीपाडवा पूजा, प्रतिष्ठान, पुणे,











## होळी –प्रतिष्ठान, पुणे



# विवाह वाढदिवस समारंभ, प्रतिष्ठान, पुणे.











# प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचा सहजयोग्यांना उपदेश.

मुंबई : २६ - २७ फेब्रुवारी ८७

सहजयोग मला फार पूर्वीपासूनच माहीत होता; हे ज्ञान मला - जन्मत:च उपजत होते. पण त्याबद्दल उघडपणें सांगणे हीच मुख्य अडचण होती आणि ते अद्धितीय ज्ञान कसे प्रकट करावे याचाच मी विचार करत असे.

एक गोष्ट मात्र माझ्या मनांत ठाम होती आणि ती म्हणजे सातवे चक्र उघडल्याशिवाय कांही होणार नाही, ते मी ५ मे या दिवशी करूं शकले. खरं तर ती एक गुप्त गोष्ट होती. पूर्वी ब्रह्मचैतन्य अव्यक्त होते; ते स्वत:ला प्रकट करूं शकत नव्हते. म्हणून ज्या कांही थोड्याच व्यक्तींना साक्षात्कार मिळून तेथपर्यंत पोचता आले त्यांनी ते निराकार, निर्गुण आहे असेच सांगितले. ही स्थिती पाण्याचा थेंब सागरांत मिसळून जणूं नाहींसा व्हावा अशी होती. म्हणजे ब्रह्मचैतन्याबद्दल काय ,कसे व किती प्रकारे सांगावे याचा उलगडा कुणालाच होत नव्हता. पृथ्वीच्या पाठीवर अवतरलेल्या थोर सिद्ध-पुरुषांनी, आत्मसाक्षात्कार मिळूनही त्या स्थितीवर पोचलेल्या अनुयायांना - (असे योग्य शिष्यही फार थोडेच होते)- त्याचा अनुभव देण्याचा प्रयत्न केला; त्यांना ब्रह्मचैतन्याची अनुभूती दिली. पण मुळांतच हे ब्रह्मचैतन्य व्यक्त स्थितीला नसल्याने ते सारेच त्या महासागरांत विरघळून गेले.

संत ज्ञानेश्वरांनी समाधि घेतल्यावर लोकांना वाटले की याबद्दल कुणी सांगू शकणार नाहीं. म्हणून फारच थोड्या मंडळींना ब्रह्मचैतन्याची अनुभूति मिळाली तरीही ही अनुभूती इतरांना प्रत्यक्षपणे मिळणे म्हणजे हे चैतन्य आपल्या हातांच्या बोटांवर जाणवणे, इंद्रियांद्धारा त्याची संवेदना होणे, मनोव्यापारातून किंवा बुद्धीमधून त्याची ओळख होणें हीच मोठी अडचण होती. तरीही पूर्वीच्या सर्व संतांच्या प्रयत्नामधून त्याच्यासाठीची पूर्वतयारी होत होती.

आतां मी त्या ब्रह्मचैतन्याचे " पूर्ण अवतरण " म्हणून साक्षात स्वरूपांत तुमच्यासमोर आले; अर्थात जे आजपर्यंत निराकार होते ते सगुण-साकार होऊन प्रगट झाले आहे. पूर्वीचे सर्व ज्ञानी पुरुष त्याचेच अंश होते पण आतां ते पूर्ण स्वरूपांत प्रगट झाले आहे आणि त्या चैतन्यरूपी सागरांतील जलसिंचनाने लोकांच्या मनाचे पोषण- धारण होऊन त्यांची कुण्डलिनी जागृत होत आहे, त्यांना साक्षात्कार मिळत आहे आणि त्या चैतन्याची जाणीव हळु -हळु त्यांना हातांवर जाणवूं लागली आहे. म्हणूनच या व्हायब्रेशन्सबद्दल आजपर्यंत कुणी स्पष्टपणे बोलत नव्हते; आजपर्यंत अव्यक्त राहिल्यामुळेंच फक्त चैतन्यलहरी असेच शब्द वापरले जात. ती फक्त एक स्थिती होती आणि ती स्थिती प्राप्त झाल्यावरच त्याचा अनुभव व आनंद मिळत असे पण जडरूपामुळे त्याची ओळख होत नव्हती. अर्थात त्या स्थितीवर आलेले संत मोह,क्रोध इ. विकारांच्या पलीकडे गेले होते. हे सत्य आपल्यासमोर आहे. पण कुण्डलिनी जागृत होते म्हणजे काय, ते कसे होते, ब्रह्मचैतन्य म्हणजे काय हे कुणी सांगितले नव्हते किंवा त्याची प्रत्यक्ष अनत्भूती देऊं शकत नव्हते. त्यामुळेच अनेक लोकांमध्ये कथा, कहाण्या इ. गोष्टीस्वरूपात त्याबद्दल बोलले जात होते.

हेच सर्व प्रत्यक्षपणें मी दाखवूं शकले, म्हणजे ब्रह्मचैतन्याचे पूर्ण व साक्षात रूप तुमच्यासमोर आले आहे. आतां तुम्ही त्याची अनुभूति मिळाल्यावरही त्या सागरामध्यें विरघळून जाणार नाहीं इकडे माझे लक्ष राहील. असे समजा की सर्व ब्रह्मचैतन्य एका विशाल घड्यामधें ओतले आहे आणि तुमच्यामधील चैतन्याची लहान-लहान मडकी त्यामध्ये ठेवली आहेत.म्हणजेच मी तुम्हा सर्वांना माझ्यामधें जैविकांसारखे (Cells) धारण केले आहे आणि त्यांतूनच तुमचे रक्षण, सांभाळ, पोषण, स्वच्छता होणार असून तुमच्यामधून पुढील कार्य घडवून आणणार आहे. त्याचबरोबर हेहि लक्षांत घ्या की मी - महामाया- आहे, म्हणून सर्व कांही सावकाशीने, हळू-हळू योग्य वेळी व योग्य तऱ्हेने घडवून आणणार आहे.

सातवे चक्र उघडल्यावर तुमची सर्व चक्रे सहस्रारामध्यें कार्यान्वित झाली आहेत. त्यामुळेंच मी तुमच्या सर्व चक्रांवर आणि त्यांच्या देवतांवर कार्य करू शकले. कोणत्याही देवतेची तुम्ही प्रार्थना करा की त्या चक्रावर तुम्हाला व्हायब्रेशन्स जाणवतील . हाच मी साक्षात ब्रह्मचैतन्य असल्याचा पुरावा आहे. ब्रन्हचैतन्यच आदिशक्ती आहे आणिआदिशिवही माझ्या हृदयांत आहेत. पण मी

मानवीस्वरुपांत आले असल्यामुळें तुम्हाला हे ओळखणें अवघड आहे. इतर सामान्य लोकांना हे सांगितले तरी समजणार नाहीं; पण सहजयोग्यांना ते समजेल म्हणून त्यांनाच फक्त हे सांगण्यासारखे आहे. हे सत्य पचवणंही सोपे नाहीं. एवढेच काय पैसा-सत्ता सांभाळणेही आजकाल कठीण आहे; म्हणून सामान्य लोकांना मीच सर्व अवतरणांकडून कार्य करवते हे समजणें फार अवघड आहे.

एकदा मी औरंगाबादमध्ये असताना एका मुलानें मला सांगितले की त्याच्या असे वाचनात आले आहे की ब्रह्मचैतन्य हे त्याची जाणीव होण्या- न होण्याच्याही पलीकडे आहे. मग मी त्याला सांगितले की ते खरे असले, तरी त्याची जाणीव करून घेण्याचा प्रयत्न कर; त्याचवेळीं माझ्या मनांत ठरले की आता मी कांहीं थोड्या लोकांना हे सांगितले पाहिजे; कारण आतां ती वेळ आली आहे; आजपर्यंत सर्व धर्म वेगवेगळ्या तऱ्हेनें आपापल्या मार्गाने चालले होते पण आता त्यांचे एकसूत्रीकरण होत आहे. आतां मी ख्रिस्त, मोहम्मद इ. सर्वांबद्दल समजावून सांगेन कारण ते सर्व एकाच पूर्णाचे-ब्रह्मचैतन्याचे -अंश आहेत.

माझ्याबद्दल शास्त्रज्ञ मंडळींना मात्र अजिबात सांगू नका; त्यांना एवढेंच सांगा की ही एक नवीन प्रणाली आहे आणि ती सांगून समजण्यासारखी नसली तरी ते '' घटित '' (happen) होत असल्याचे तुम्ही स्वत: अनुभवले आहे. माझ्याबद्दल कांही बोलूं नका; त्यांना एवढेच सांगा की कुण्डलिनी- जागृतीची ही पद्धत माताजी श्रीनिर्मलादेवींनी सांगितली आहे; '' ते कसे घडून येते त्यांनाच माहीत '' असे सांगून सर्व माझ्यावर सोपवा.

काही मोजके अपवाद सोडले तर आजपर्यंत कुणी इतरांना आत्मसाक्षात्कार देऊं शकत नव्हते. ज्या लोकांना तो मिळाला ते स्वत:ला फार कठोरपणें शुद्ध (स्वच्छ)करण्याच्या मागे लागलेले साधक होते. उदाहरण द्यायचे तर बुद्धांना हीच तपश्चर्या समजली होती म्हणून त्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला; ते त्याच्यासाठीच कष्ट करत होते. त्याचाच त्यांना ध्यास लागला होता आणि त्यासाठींच ते प्रार्थना करत होते. म्हणून ब्रह्मचैतन्य जणूं त्यांच्यामध्यें शिरले. पण त्यांना फक्त ती स्थिती मिळाली; त्यानंतर दुसऱ्यांना तो अनुभव ते देऊ शकले नाहींत. आणि आता हेच सामूहिक स्तरावर शक्य झाले आहे हे महत्त्वाचे आहे. म्हणजे अव्यक्त ब्रह्मचैतन्य आतां स्वत:लाच प्रगट करूं लागले आहे.

साधं उदाहरण पहा; तुम्हाला इलेक्ट्रिसिटीचा शोध लागला आणि त्याबद्दल तुम्ही दुसऱ्याला कांहींच सांगितले नाहीं तर त्याचा कुणाला काय उपयोग होणार? पूर्वीच्या अवतरणांना तसे करण्याची जरूरी वाटली नाहीं असे नव्हे तर लोकांबरोबर तो संवाद नव्हता. म्हणजे आंधळ्या माणसाला तुम्ही काय दाखवणार असे ते होते. आत्मसाक्षात्काराची जाण असलेले आणि तो पचवण्याच्या स्थितीला आलेले लोक त्या काळी नव्हते. ज्या थोड्या लोकांना आत्मसाक्षात्कार मिळाला, त्यांचे स्वत:चे सहस्रार उघडले होते पण ते त्यामध्येंच हरवून गेले आणि म्हणून त्याची अनुभूति वैयक्तिक स्तरावरच राहिली आणि सामूहिक स्तरावर पोचली नाही. पण आता ते सर्व संपले आहे आणि सामूहिक स्तरावर त्याचा आविष्कार होऊ लागला आहे.

ही स्थिति येईपर्यंत बरेच कांही करावे लागले. त्यामध्ये ख्रिस्त, मोहम्मद, नानकसाहेब, तुकाराम अशां सारख्या थोर पुरुषांनाही बरेच कांहीं भोगावे लागले. खरे तर ही मंडळी मानवकल्याणासाठीच वैकुंठामधून आली होती. पण त्यांचाही छळच केला गेला. म्हणून त्यांच्या कष्टांतून कांहीं घडूं शकले नाहीं. मला वैकुंठच काय पण त्यापलीकडचे सर्व कांहीं माहीत आहे. पण मी त्याचा कधीं उच्चार केला नाहीं. अजून त्यासाठीं मानव तयार झालेला नाहीं. खिचडी बनवण्यासारखे हे कार्य आहे, ती अजून बनली नाहीं, तिला चांगले शिजायला पुरेसा वेळ हवा ना? सध्या जे थोडे लोक तयार होत आहेत ते पूर्वीच्या अवतरणांच्या मोजक्या शिष्यांएवढेच तयार आहेत. माझ्यासमोरच्या तुमच्यासारखे अजून खूप लोक येणार आहेत. वेळ लागला तरी ते येणारच. असे खूप लोक तयार होणार आहेत, बाकीचे जे राहतील त्यांना विसरून जा. कांहीं लवकर तयार होतात तर कांहींना वेळ लागतो.

काळ हे माणसाने निर्माण केलेले बंधन आहे. माणसाबरोबरच काळाचाही जन्म झाला. माणसाच्या संवयींमुळेच काळ निर्माण झाला. सहजयोगांत आल्यावर तुमच्या संवयी सुटतात. म्हणून कसल्याही संवयींचे समर्थन करू नका, नाहीं तर त्या सुटणार नाहींत. एका आयुष्यांत तुम्ही आत्मसाक्षात्कार मिळवूं शकला आणि हे सर्व समजूं शकलात तर याच आयुष्यामध्यें तुम्ही वर वर्णन केलेल्या उच्च

स्थितीला पोचूंही शकता. नाहींतर अर्धे-कच्चे रहाल आणि पुढच्या प्रगतीसाठीं पुन्हा नवीन जन्म घ्यावा लागेल. सहजयोग असाच काहीं काळ कार्यान्वित होणार आहे. पण ही शेवटची संधी आहे. सहजयोगांतही चुकीच्या मार्गाने चाललेले लोक पाहिले की माझ्या अंगावर काटा येतो, कांही वेळ असे लोकही भेटतात.पण लवकरच ते बाहेर फेकले जातात. हे चालायचेच, म्हणून तुम्ही निराश होऊ नका, उलट जास्त प्रयत्न करून स्वत:ला प्रस्थापित करा.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे कायम संतुलनांत रहा. सहजामध्ये कसे पारंगत व्हायचे याची काळजी करूं नका; मध्यामध्ये राहिलात की सर्व कांही सुरळीत होत राहणार आहे. माझे पूर्ण लक्ष असते व तुमच्या पोषणाची व्यवस्था मीच करत असते. एरवी तुम्ही डावीकडे किंवा उजवीकडे झुकता, वाईट सवयींमुळे डाव्या बाजूला तर महत्त्वाकांक्षा बाळगल्यामुळे उजव्या बाजूला जाण्याची शक्यता असते. <u>मला हृदयांत आणण्यासाठीं तो भाव तुमच्यामधें प्रखर झाला पाहिजे</u>; तो भाव जोपासण्याचा सतत प्रयत्न करत रहा. एरवी तुमच्या भावना वा संवयी तुमच्यावर सहज प्रभाव पाडतात. मग माझ्याबद्दलचा श्रद्धा-भाव हृदयापासून बाळगणे काय अवघड आहे? एकदा हा भाव बळकट झाला की तो तुमच्या नसा-नसांमध्ये उतरतो आणि अखेरपर्यंत सोबत करतो. <u>तो कसा व किती दृढ करायचा हे तुमच्यावरच अवलंबून आहे.</u> तुम्ही डासांना पळवून लावण्यासाठीं घरात धूर पसरवता तसा हा भाव हृदयांत पेटला पाहिजे.

प्रश्न पडतो तो हा, की हे कसे करायचे? हा भाव दृढ होण्यासाठी काय करायचे? उत्तर एकच आहे आणि ते म्हणजे <u>तुमचे चित्त स्थिर -पूर्णपणें स्थिर- करायला शिका</u>. हाच चित्त-निरोध. दृष्टीसमोर जे कांहीं दिसते त्यांत चित्त अडकून देऊं नका. सवयीने हे जमेल. बाह्य दृश्य-सृष्टीशी आपला संबंध व संपर्क चित्तामधून होत असतो. म्हणून चित्त कुठें धांवत आहे इकडे जागरूकपणें लक्ष ठेवा. '' माझे चित्त कुठें चालले आहे '' असे स्वत:लाच विचारत रहा. संवेदनशीलता व ज्ञानयुक्त जाणीव या दोन्हीमध्यें आपले चित्त विभागलेले आहे. संवेदना जेव्हा जाणीवयुक्त होते तेव्हां त्याला चैतन्यमय जाणीव असे म्हणतात. (vibratory awareness) ही चैतन्यमय जाणीवच तुम्हाला center मध्ये ठेवते. जर कुठे चित्त भरकटले की तुम्हाला उष्णता जाणवते. ही सर्वव्यापी शक्तीच तुमच्या प्रगतीसाठी हे सारे करत असते.

चित्ताचे कार्य समजण्यासाठीं एक उदाहरण पाहूं या. एक कापडाचा मोठा तुकडा घ्या; साक्षात्काराच्या आधीं हे चित्त या कापडासारखे पसरलेले असते. आता कापडाच्या मधोमध खालच्या बाजूला बोट धरून ते वर उचला; आता पहा की उचलले जात असताना हे कापड बोटाच्या टोकाखाली पडतांना बोटाभोवती खाली येते. त्याचप्रमाणें कुण्डलिनी जागृत होऊन जसजशी सहस्रारापर्यंत येते तसतसे तुमचे चित्तही सहस्रारापर्यंत उचलते आणि तेथील जागृत ब्रह्मचैतन्याचा प्रकाश त्याच्यामध्यें उतरतो; आणि ते मध्य बाजूच्या सुषुम्ना नाडीच्या मार्गामध्यें पसरते. प्रत्यक्षामध्यें साक्षात्कारानंतर आपले चित्त बाहेरच्या दृश्य सृष्टीपासून आत ओढले जाते. हीच वर म्हटलेली स्थिती.

आपल्या सततच्या बाह्य-दृश्याशी संबंध ठेवण्याच्या सवयीमुळें चित्त या स्थितीमध्ये टिकून रहात नाही. म्हणून त्याला सारखें आतमध्यें वळवावे लागते. तुमच्याबरोबर असूनही मला हे कसे करावे समजत नाहीं. माझ्या दृष्टीनें हे तुम्हाला बोटीमध्यें घेऊन ती बोट पलीकडे नेण्यासारखा प्रयत्न मी करत रहाते, पण तुम्हीच स्वस्थ बोटीमध्यें बसून न राहता, मी बोट चालवीत असूनही एक हात किंवा पाय बाहेर पाण्यामध्यें ठेवला, मग तुम्हाला सुरक्षित ठेवताठेवता माझी काय त्रेधातिरपीट उडत असेल कल्पना करा.

म्हणून मी सत्संग करा असे म्हणते. सहजयोग्यांच्या संगतीत असलात की तुमचे चित्त सेंटरमध्यें -मधोमध- ठेवायला मदत मिळते.आत्मसाक्षात्कारामुळें तुमच्या डाव्या-उजव्या संस्थांना आराम मिळतो. त्यामुळें कुण्डलिनीकडून चक्रांचे अधिक पोषण होते आणि कुण्डलिनीचे अधिक धागे वर येत राहतात; याबरोबरच चित्त मध्यामध्यें खेचले जाते, ते जास्त प्रकाशित होते व जास्त कार्यक्षम होते. असे प्रकाशित चित्त तुम्ही जिथें वळवाल तिथे कार्य घडून येईल आणि पुन्हा ते मध्यावर येईल. कारण त्या स्थितीमध्यें ते कशांत गुंतलेले नसते.

<u>या स्थितीमध्यें येण्यासाठी शरणागति हवी.</u> '' श्रीमाताजी, सर्व आपण करता, मी कांहींच करत नाही.'' हा मंत्र जपा. कसल्याही मायेमध्ये अडकू नका. पैशाचा व्यवहार करतांना तर हे फार महत्त्वाचे आहे. तुम्ही माझ्यासाठीं सारे कांहीं करत आहांत हे विसरू नका. नवीन लोकांसाठीं मी या मानव स्वरूपात कुणी नाही हेही लक्षांत असूं द्या.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

# शिवपूजा

१२-१३ मार्च ,२००५

बालेवाडी, पुणे -वृत्तांत

आदल्या दिवसापासूनच परगांवचे सहजयोगी स्टेडियमध्ये मुक्कामास आले होते. त्यामध्ये विदेशी सहजयोग्यांचे प्रमाण जास्त होते.भारतातील व विदेशी सहजयोग्यांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था वेगवेगळ्या ठिकाणी केलेली होती.तसेच दिवसाचे सर्व कार्यक्रम हे बॅडमिंटन हॉलमध्ये तर संध्याकाळचे सर्व कार्यक्रम हे मुख्य स्टेडियममध्ये ठेवण्यात आले होते.

१२ मार्च २००५

आजच्या दिवसाची सुरुवात सकाळी ६:३० वा सामुहिक ध्यानाने झाली. त्यानंतर सकाळी १०:०० च्या सुमारास कार्यक्रमाची सुरवात वैतरणा ॲकॅडमीच्या कार्यक्रमाने झाली. त्यामध्ये श्री सुब्रम्ण्यम आणि त्यांचे शिष्य यांनी भजने सादर केली. त्यानंतर सितारवर राग शामकल्याण झाला. रागमाला डॉ. आपटेंच्या शिष्यांनी वाजविला. त्यानंतर कुचीपुडी नृत्याचे प्रकार ॲकॅडमीच्या सात विदेशी मुलींनी सादर केले त्यातील शिवस्तुती/तांडव प्रकार उल्लेखनीय होता. सदर कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन ॲकडमीचे संचालक डॉ. अरुण आपटे यांनी केले.

दुपारच्या ३:३० च्या सत्रात डॉ अरुण आपटे यांनी, चक्रे त्यांचे राग व त्याचा उपयोग यावर सर्वांना मार्गदर्शन केले.

संध्याकाळी ७:०० च्या सुमारास मुख्य स्टेडियममध्ये स्टेजचा पडदा उघडला गेला आणि स्टेजवर श्रीमाताजींचे सिंहासनावरील फोटोचे दर्शन सर्वांना झाले. मागच्या बाजूला नृत्य करीत असलेला तीनमुखी गणपती शोभून दिसत होता. कार्यक्रमाच्या सुरवातीस श्रीबागडदे यांनी 'रचिल्या ऋषीमुनींनी ' श्री सुब्रमण्यम यांनी नमामि शंकर भजामि शंकर ,डॉ राजेश यांनी जय शिव शंकर भोले, मेरी मॉ पूनम का चांद ही भजने गायली. त्यानंतर श्री राजेंद्र पुगालिया यांनी शिवपूजा कार्यक्रमाची सुरुवात होत असल्याचे जाहीर करताना सर्वांनी त्याचा आनंद घ्यावा तसेच सर्वांनी जास्तीत जास्त ध्यान करावे असे सांगितले. यानंतर रवींद्र जैन यांचा कार्यक्रम होणार असल्याचे सांगितले .

त्यानंतर श्रीबागडदे यांनी-सवर जाये जीवन मेरा, श्री सुब्रमण्यम् यांनी- मेरी दुनिया है मॉ तेरे चरणो में, डॉ. राजेश -बैठके मॉ ने बोले मेरे तकदा गया ही भजने सादर करीत असताना श्री माताजींच्या वतीने त्याच्या फॅमिलीतील श्री रोमेल यांचे स्टेजवर आगमन झाले. श्री नलगीरकर यांनी शिवपूजा कमिटीतर्फे त्यांचे स्वागत श्री पुगालिया यांच्या हस्ते केले.

रात्री ८:४५ च्या सुमारास गायक,संगीतकार, गीतकार श्री रवींद्र जैन यांच्या ऑक्रेस्ट्रा ग्रुपचे स्टेजवर आगमन झाले. त्यावेळी संयोजक श्री किसन शर्मा यांनी सांगितले की, ते स्वत: बाबामामांचे चांगले मित्र होते. रवींद्र जैन यांच्याबद्दल सांगितले की, त्यांनी १० वर्षापूर्वी श्रीमाताजींच्या समोर कार्यक्रम सादर केला होता.त्यांच्या सहकाऱ्यांनी शंकर मेरे कब होंगे दर्शन तेरे, हे भोले शंभू पधारो बैठे छूपके सती के पास,इत्यादी गाणी गायली

त्यानंतर पं. रवींद्र जैन यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरुवातील पूर्ण वदं पूर्ण विदं पूर्णा पूर्ण हा श्लोक गायला. त्यानंतर राम सिया राम जय जय राम ही चौपाई . त्यानंतर जय देवी माँ पुनावाली जय देवी माँ सहजयोगी माँ निर्मल माँ मूलाधार सिद्धीविनायक ब्रह्मदेवसरस्वती ज्योत जगायी हे भजन सादर करताना सर्व चक्रांच्या देवदेवतांची स्तुती करीत हे सर्व श्रीमाताजींनी मला सांगितले आहे हे गात सर्वांना मंत्रमुग्ध केले. ही रचना स्टेजवर एकाएकी व उत्स्फूर्तपणे झाली हे खरोखरच उल्लेखनीय आहे. त्यानंतर ओम नम: शिवाय, मंगल कारण शिवका नाम, मंगल को ही जन्मे मंगलही करके मंगल है हनुमान, शिवजी जटापे गंगा तोले, घुंगरू की तरहा बजाता ही रहू, माताने राह दिखाई है सहजकी ज्योत दिखाई है, डम डम डम डम डमरू बोले, शेवटी विश्व वंदीता सर्व पूजिता ही भजने सादर करीत असताना सर्वत्र प्रचंड व्हायब्रेशन् जाणवत होती. प्रत्यक्ष श्रीमाताजी साकार रुपात उपस्थित असल्याचा भास होत होता. सदर भजने ऐकताना अनेकांचे डोळे आनंदाने पाणावले होते. साधारण १२.३० च्या सुमारास कार्यक्रम संपला.

१३ मार्च २००५

आजच्या पूजेच्या दिवशी सकाळचे ध्यान ६:०० ते ६:३० या वेळात कॅसेट लावून ध्यान झाले. त्यानंतर १०.०० च्या

सुमारास वाशी हॉस्पिटलच्या डायरेक्टर मिसेस राय यांनी हॉस्पिटलमध्ये सहजयोगाच्या माध्यमातून दिल्या जात असलेल्या उपचारांची व त्यामुळे बरे झालेल्या आजारांची माहिती दिली. तसेच हॉस्पिटलचा ई मेल व दूरध्वनी क्रमांक देऊन आपल्याला विनामूल्य माहिती देण्याची व्यवस्था केली असल्याचे सांगितले. शेवटी डॉक्टरांनी सहजयोग्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. दुपारी भजनांचा कार्यक्रम झाला.

संध्याकाळी ६:०० पासूनच स्टेडियममध्ये सर्वजण येऊ लागले. पूजेचा दिवस असल्याने वातावरण प्रसन्न होते. ७:०० च्या सुमारास स्टेजसमोरील पडदा बाजूला झाला आणि स्टेजवरील डेकोरेशन दिसले. त्यात मागच्या बाजूला श्रीमाताजींच्या चेहऱ्यात शिवाची बसलेली प्रचंड ध्यान मूर्ती व बाजूला ब्रह्मांड होते. तर स्टेजसमोरील व स्टेजच्या दोन्ही बाजूच्या कमानीवर द्राक्षाचे घड लावून सजविले होते. त्यासाठी जवळजवळ १ टन द्राक्षांचा वापर केला होता.

सुरुवातीला तीन महामंत्र झाल्यावर डॉ.अरुण आपटे व श्रीबागडदे यांनी जय गणराया श्री गणराया मंगल मूर्ती मोरया हे भजन गायले. त्यानंतर शिवरात्री पुजा २००१ ची सी.डी. कॅसेट मोठ्या स्क्रीनवर दाखविण्यात आली. ८:१५ च्या सुमारास श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन होत असताना स्टेडियमध्ये त्यांच्या गाडीच्या दोन्ही बाजूला भुईनळे लावण्यात आले होते. तसेच आकाशात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली होती. श्रीमाताजी आसनावर स्थानापन्न झाल्यानंतर समोरचा पडदा बाजूला केला आणि श्रीमाताजींचे सर्वांना दर्शन झाले. दोन सुवासिनींनी त्यांना ओवाळले व सर्व जगातील सहजयोग्यांच्या वतीने चरणावर पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर गौरी पूजा सुरू झाली त्यावेळी २१ लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणाची पूजा केली. त्यानंतर ओटी भरण्यात आली. आणि आदिशक्तीचे गौरी स्वरूपातील दर्शन सर्वांना झाले.

गौरी पूजेनंतर श्रीमाताजींचे सिंहासन शुभ्र वस्त्राने सुशोभित करण्यात आले. तसेच शुभ्र वस्त्र परिधान करून, कपाळी भस्म , गळ्यात रुद्राक्षाची माळ ,अशा श्रीमाताजींचे श्री शिवरूपात दर्शनाचा लाभ झाला. त्यावेळी त्यांच्या चरणावर श्रीपुगालिया व श्री नलगीरकर यांनी बेल अर्पण केला. पूजेच्या वेळी सुरुवातीला गणपती अथर्वशीर्ष, जागो सबेरा आया है, शंकर भोले भाले, शंभू भोला भाला. ही भजने झाली. पूजेत श्री शंकराची आरती झाली. त्यानंतर तीन महामंत्र झाल्यानंतर पूजा सोहळा संपन्न झाला. श्रीमाताजींना महाप्रसादाचा नैवेद्य अर्पण केल्यानंतर आदिशक्ती परत आपल्या निवासस्थानी गेल्या. त्यानंतर सर्वत्र पसरलेल्या चैतन्यात तास/दीडतास सहज म्युझिक ग्रूपने विविध भजने गाऊन, नाचून सर्वांनी पूजेचा आनंद साजरा केला. बाहेरच्या बाजूला महाप्रसादाची व्यवस्था केली होती.

दिनांक १३ मार्च रोजी शिवपूजा संपन्न झाल्यानंतर ज्यांना वाढदिवस पूजेसाठी थांबावयाचे होते अशा सर्वांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था स्टेडियममध्ये केली होती. त्यांच्यासाठी दिनांक १४ ते १८ या कालावधीत रोज सकाळी ६:०० वा सामूहिक ध्यान तसेच संध्याकाळी ७:०० च्या सुमारास रोज बॅडमिंटन हॉलमध्ये भजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.अनेक विदेशी सहाजयोग्यांच्या सोबत दि १४ ते १८ या कालावधीत अनेक पब्लिक प्रोग्राम तसेच मिरवणुका काढून सहजयोगाच्या प्रसाराचे कार्य झाले तसेच स्थानिक ठिकाणी भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

● ● ●

श्रीमाताजींच्या वाढदिवसाबद्दल जगभरांतील अनेक मान्यवर व नेत्यांकडून शुभसंदेश आले त्यामधें त्यांनी व्यक्त केलेल्या भावना:

○ भारताचे राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम

"त्यांनी सर्व जगभर फार मोठे कार्य केले आहे. मी त्यांना एकदा प्रत्यक्ष भेटलोही आहे. परत भेट व्हावी ही इच्छा आहे. त्यांना दीर्घायुष्य मिळो ही प्रार्थना."

○ तैवानचे राष्ट्रप्रमुख

"श्रीमाताजी आदिशक्तीचा अवतार आहेत. त्यांनी जगभर परमेश्वराचे कार्य केले आहे."

○ ऑस्ट्रियाचे राष्ट्रपती

"श्रीमाताजींना दीर्घ आयुरारोग्य लाभो ही प्रार्थना."

○ कोलंबियाचे राष्ट्रपती

"कोलंबियातील सहजयोग्यांनी पुढाकार घेऊन श्रीमाताजींचे कार्य पुढे न्यावे."

त्याचबरोबर टर्कीचे महापौर, जपानचे महापौर इ. नेत्यांनीही वाढदिवसाच्या शुभेच्छा पाठविल्या आहेत.

# वाढदिवस पूजा, बालेवाडी, पुणे
## दिनांक १९,२०,२१ मार्च २००५ (वृत्तांत)

बालेवाडीत दिनांक १८ मार्चपासूनच मोठ्या प्रमाणावर सहजयोगी येण्यास सुरूवात झाली होती. त्यांचे स्वागत व राहण्याची तसेच सर्व सोईंची व्यवस्था करण्यात येत होती.

१९, मार्च २००५

आजच्या दिवसाची सरूवात सकाळी ६:०० वा सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर ९:३० वा. निर्मल इन्फोसिस प्रा.लि. या कंपनीतर्फे स्वरतरंग हा बॅडमिंटन हॉलमध्ये कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाची सरूवात करताना सूत्रसंचालक श्री प्रशांत दिवेकर व कु प्रिया यांनी वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ या श्लोकाने केली. सदर सूत्रसंचलन करताना अतिशय खुबीने सिंथेसायझर, तबला, पेटी याचा वापर करीत वातावरणात चैतन्य व प्रसन्नता आणली होती.

त्यानंतर संजय तलवार यांना स्टेजवर निमंत्रित केले. त्यांनी १९८६ साली आत्मसाक्षात्कार मिळाल्यानंतर गाणी लिहिण्याची व कंपोज करण्याची त्यांना शक्ती श्रीमाताजींनी दिल्याचे त्यांनी सांगितले. सुरूवात शंकराचार्यांच्या श्लोकाने केली. त्यानंतर जागो कुंडलिनी माँ करो सबपे कृपा, we are in heart of Shri Mata Nirmala Ma हे इंग्रजी भजन गाऊन सर्व विदेशी सहजयोग्यांना नाचवले. त्यांच्या आजपर्यंत १६ कॅसेट प्रकाशित झालेल्या आहेत त्याची रॅायल्टी श्री राजेंद्र पुगालिया यांच्या हस्ते देण्यात आली.

त्यानंतर प्रशांत/ प्रिया यांनी कंपनी स्थापनेमागचा श्रीमाताजींचा उद्देश सांगताना सांगितले की, सहजप्रचार प्रसारात एकवाक्यता आणि कंपनीच्या माध्यमातून सहजयोगाचे सर्व साहित्य कॅसेट, पुस्तके , फोटो, परिचयपुस्तिका, एकाच किमतीत, स्वस्तात, तसेच वर्षभर उपलब्ध होण्यासाठी आणि कलाकारांची कदर करण्यासाठी स्थापना झाली असल्याचे सांगितले.

त्यानंतर किराणा घराण्याच्या कु. मधूदीदी स्टेजवर आल्या. त्यांनी श्री माँ आके दिलमे समाओ, श्री माँ के गुण सब गाईये ही भजने म्हटली. त्यांचा सत्कार श्री नलगीरकर यांनी केला.

पं. धाकडे गुरुजीं व्हायलिन वाजवण्यासाठी स्टेजवर आले.त्यांच्या सहजयोगात व्हायलिनच्या मेडिटेशन व व्हायब्रेशन या दोन कॅसेट निघाल्या होत्या. त्यांनी राग अही भैरव वाजवला त्यांना तबल्याला श्री संदेश भोपटकर यांनी साथ दिली. त्यांना रॅायल्टी व सत्कार श्री नलगीरकर यांनी केला.

सदर कंपनीच्या उपस्थित असलेल्या वितरकांचा सत्कार कंपनीचे डायरेक्टर श्री राजेंद्र पुगालिया यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर कु. वर्षा कळंबटे हिने बसविलेले लहान मुला-मुलींनी, वाघ्या चालला जेजुरीला या गाण्यावर नृत्य केले.त्यानंतर मुखिराम यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी श्री जगदंबे आई `रे मेरी निर्मल माँ हे भजन म्हटले. त्यांचा सत्कार श्री पुगालिया यांनी केला. श्री राजीव बागडदे व पुणे म्युझिक ग्रूपने नानक मोहम्मद इब्राहिम हे भजन म्हटले त्यांना रॅायल्टी व सत्कार श्री पुगालिया यांनी केला. शेवटी आज ज्यांनी भजने म्हटली अशा सर्वांना स्टेजवर निमंत्रित करण्यात आले त्यांनी, प्यार भरे ये जो निर्मल नैन , सिटींग इन द हार्ट ऑफ दि युनिव्हर्स ही भजने झाल्यावर सकाळचे सत्र संपले. दुपारी ३:३० वा. परत भजनाचा कार्यक्रम झाला.

संध्याकाळी ७:०० वा मुख्य स्टेडियमधील स्टेजसमोरचा पडदा दूर झाला आणि समोरचे डेकोरेशन दिसले. स्टेजच्या मधोमध श्रीमाताजींचे आसन बाजूला पांढरे दोन खांब मागच्या बाजूला मोठे दोन खांब बाजूला आणखी दोन खांब, श्रीमाताजींच्या सिहासनाला व खांबांना फिक्कट जांभळ्या सिल्कच्या कापडाचा वापर करून आरास केली होती. वरच्या बाजूला मधोमध झुंबर बाजूला सर्वत्र दिवे असे अतिशय सुंदर मोहक डेकोरेशन दिसत होते.

कार्यक्रमाची सरूवात ३ महामंत्रांनी झाली. त्यानंतर दीपक वर्मा यांनी, जय गणपती वंदन गणनायक हे भजन म्हटले. राजेंद्र पुगालिया यांनी वाढदिवस पूजेसाठी जमलेल्या सर्वांचे स्वागत केले. पराग राजे यांना कार्यक्रमाचे सूत्रसंचलन करण्यास आमंत्रित केले. सूरूवातीला श्रीबागडदे यांनी, जय हे जय हे मोक्षप्रदायनी निर्मल माँ, डॉ अरुण आपटे यांनी जय जय हो महिमा तेरा, सौ सुरेखा आपटे यांनी तुम आशा विश्वास हमारा, दीपक वर्मा यांनी जपलो नाम है प्यारा श्री माँ जय माँ जय जय माँ, आंध्र प्रदेश ग्रूपने तेलगु, कन्नड व इंग्रजी भाषेत एकत्र विश यु हॅपी बर्थ डे हे भजन म्हटले.श्री बागडदे यांनी नजरमे मेरी तू ही कव्वाली गायली.

८:३० च्या सुमारास श्री नलगिरकर यांनी श्रीमाताजींनी ८२ वा वाढदिवस या चैतन्यमय भूमीमध्यें` पुण्यात साजरा करण्याची परवानगी दिल्याबद्दल सर्व सहजयोग्यांतर्फे आभार मानले.तसेच सर्व जगातील

सहजयोगी वाढदिवसासाठी उपस्थित राहिल्याबद्दल कमिटीतर्फे त्यांचे आभार मानले. तसेच सर्वांनी या काळात जास्तीत जास्त ध्यान करण्याचे आवाहन केले.

त्यानंतर आजचे प्रमुख गायक श्री अजित कडकडे यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सरूवातीला पिया घर आये मोरे सैया हे गाणे तासभर म्हटले., त्यानंतर नारायणी नमोस्तुते, संत कबिर यांचे साहेबजी वाहवा प्यार तुम्हारा वाहवा, ब्रम्ह शोधिले ब्रम्हांड मिळाले आई तुझिया धामी, ओ मैया ओ मैया ही भजने गाऊन कार्यक्रम संपवला. त्यांचा सत्कार श्री राजेंद्र पुगालिया यांनी केला, त्यावेळी अजित कडकडे म्हणाले की, १५ वर्षापूर्वी शिवाजी पार्कवर श्रीमाताजींच्या समोर गाण्यासाठी त्यांना निमंत्रित केले होते. त्यावेळी माझा आवाज बसला होता. मी तसे श्रीमाताजींना सांगितले असता त्यांनी मला सांगितले की, काही काळजी करू नका सर्व काही ठीक होईल आणि श्रीमाताजींच्या आशीर्वादात खूप सुंदर आवाज लागला. त्यानंतर ज्या ज्या वेळी सहजयोगाच्या कार्यक्रमासाठी मला निमंत्रण मिळते त्या त्या वेळी मी श्रद्धेने उपस्थित राहतो. कार्यक्रम संपला, तेव्हा रात्रीचे १२:३० वाजून गेले होते.

२०.३.२००५

सकाळी ६.०० सामूहिक ध्यान झाले. त्यानंतर ९:३० वा निर्मल इन्फोसिस्टिम प्रा.लि.च्या स्वरतरंग कार्यक्रमाचा दुसरा भाग सुरु झाला. सुरुवातीला नाशिकचे धनंजय धुमाळ आणि सहकारी यांना निमंत्रित करण्यात आले. त्यांनी सुरुवातीला जगदंबेचा जोगवा मागते, जय भारत है महान है, त्यानंतर धनंजय धुमाळ यांनी सिंथेसायझरवर राग दुर्गाकली वाजवला त्यांना तबल्याला साथ संदेश पोपटकर यांनी दिली. त्यांनी श्री पुगालिया यांना त्यांच्या आजपर्यंत निघालेल्या कॅसेच्या मास्टर कॉपी दिल्या. त्यानंतर वैतरणा ॲकॅडमीचे शिक्षक श्री सुब्रमण्यम् यांनी कनैया कनैया फूकारा करेंगे, श्री अजित सिंग यांनी मीठा मीठा है मेरी निर्मल मॉं का नाम, पुण्यातील लहान मुलांनी कॅसेटवर कोळी डान्स सादर केला. त्यानंतर पुण्यातील युवाशक्तीने शेतकरी नृत्य सादर केले.

डॉ राजेश स्टेजवर गायला बसले. त्यांना १९९२ साली श्रीमाताजींचा आशीर्वाद मिळाल्यापासून ते सहजयोगात गायला लागल्याचे सांगितले. त्यांनी सरूवातीला जिधर देखू उधर तू निर्मल मॉं निर्मल माँ निर्मल माँ, दीपक वर्मा यांनी तुम बसी हो कन कन मे माँ हे भजन सादर केल्यानंतर त्यांचा सत्कार श्री पुगालिया यांनी केला. तसेच भारतातील टॉपच्या तीन डिस्ट्रीब्युटर्सचा सत्कार स्मृतिचिन्ह देऊन केला. त्यावेळी कंपनीच्या डायरेक्टर बॅाडीवर असलेल्यांची नावे सांगितली.

पुण्यातील पिंपरी-चिंचवड परिसरातील सहजयोग्यांनी, गुरूतत्त्व आणि आत्मपरीक्षण ही समूह नाटिका सादर करताना कलियुगरूपी राक्षस मानवाला कसा त्रास देतो मात्र सहजयोगात आत्मसाक्षात्कार घेतल्यानंतर कलीचा त्रास होऊ शकत नाही. तसेच कली सहजयोग्यांना बिघडवू शकत नाही तर तोच शेवटी सहजयोगी होतो हे नाटक सादर करीत असतानाच सहजयोगातील प्रोटोकॅालसबाबत विनोदी पद्धतीने माहिती देत सर्वांना हसवले. सदर नाटक अत्यंत सुंदर झाले.

डॉ अरुण आपटे यांनी अबिर गुलाल हे भजन म्हटले. त्यानंतर आज ज्यांनी भजने सादर केली असे सर्व कलाकार स्टेजवर जमले त्यांनी एकत्र, गुंजे सदा जयजयकार, गाईये गणपती जग वंदन, जब हृदय मे बसी मेरी माँ, हे भजन झाल्यानंतर कार्यक्रम साधारण १:०० वा संपला.

मुख्य स्टेडियम मध्ये संध्याकाळी ७:०० वा पडदा उघडण्यात आला. सरूवातीला एन.जी.ओ.च्या डायरेक्टर मिस गिजीला यांनी एन.जी.ओ. मधील कामाची माहिती देताना सांगितले की श्रीमाताजींच्या कृपेत सदर संस्थेत २ ते १८ वर्षाच्या निराधार मुलांना शिक्षण देऊन त्यांना पायावर उभे केले जाते, तसेच विधवा/घटस्फोटित ४० वर्षापर्यंतच्या महिलांना आधार देऊन व्यवसाय शिकविला जातो. अद्याप ५० मुलांसाठी व महिलांची सोय आहे. तसेच सदर उपक्रमाला आपली देणगी देण्याचे आवाहन केले त्यावेळी स्क्रीनवर एन.जी.ओ. ची सी.डी दाखविण्यात आली.

पी.के.साळवे ॲकॅडमीच्या मुलांनी, माँ निर्मल माँ जय जय माँ निर्मल माँ हे भजन म्हटले. श्री बागडदे- मोहे चैन ना आयें मैया तेरे बिना, सुरेखा आपटे-अल्ला तेरे नाम ईश्वर तेरो नाम म्हटले त्यानंतर धाकडे गुरुजींना स्टेजवर आमंत्रित करण्यात आले. त्यांनी व्हायलिनवर राग सादर केला, व्हायलीनवर ब्रम्ह शोधिले ब्रम्हांड मिळाले हे भजन वाजवले

हैद्राबादचे कव्वाल यांचे स्टेजवर आगमन झाले. सरूवातीला अमिर खुस्रो यांचे गीत सादर केले, मौला अली मौला, सारे सहजयोगी खुशिया मनावो निर्मल माँ का जनम दिन है आज ह्या कव्वाल्या गात मध्येच शेर शायरी करीत सर्वांना नाचवले.१०:००कव्वाली संपल्यानंतर वाढदिवसानिमित्त आलेले संदेश वाचण्यासाठी श्री नलगीरकर स्टेजवर आले. त्यांनी सांगितले की जगातून अनेक संदेश आले असून वेळेअभावी त्यातील थोडेसेच वाचून दाखवीत आहे. आज श्रीमाताजींचे नातलगांपैकी कल्पनादिदि, साधनादिदि, अनुपमादिदि,श्री हेम उपस्थित होते.

त्यानंतर गिडो यांनी आपल्या भावना व्यक्त करताना

सांगितले की, श्रीमाताजी मला नेहमी म्हणत असत की सर्वांत महत्त्वाची श्रीकृष्ण पूजा आहे., आदिशक्ती पूजा आहे, गुरु-पूजा आहे. पण त्या कधी असं म्हणाल्या नाहीत की बर्थ डे पूजा महत्त्वाची आहे. पण मला असे वाटते की सर्व सहजयोग्यांसाठी सर्वात महत्वाची बर्थ डे पूजाच आहे. श्री डेविड यांनी सांगितले की श्रीमाताजींच्या तीन फॅमिली असून एक म्हणजे त्यांचे स्वत:चे कुटुंब, दुसरे म्हणजे सहजयोगी आणि तिसरी म्हणजे देवदेवतांची फॅमिली. वाढदिवस साजरा करण्यासाठी सर्व फॅमिली उपस्थित राहिल्या आहेत. श्री राजीव यांनी कविता वाचून दाखविली. श्री पी.के.साळवे म्हणाले की श्रीमाताजी ह्या सर्व जगाच्या आई असून मी नशीबवान आहे कारण त्या माझ्या आई आहेत. त्यांचे कार्य आपण सर्वांनी केले पाहिजे सर्व जगाने प्रेमाने वागले पाहिजे. साधनादिदि म्हणाल्या की श्रीमाताजी आज खूप खूश असून त्यांना वाढदिवस साजरा करायला आवडते. आज त्या निराकार रुपात उपस्थित असून आपल्या सर्वांच्या शुभेच्छा श्रीमाताजींपर्यंत पोहोचल्या आहेत. कल्पनादीदी म्हणाल्या, मी अशी प्रार्थना करते की त्यांना फार मोठे आयुष्य मिळो, जगभर शांतता व प्रेम पसरविण्याचे त्यांचे कार्य आपण पूर्ण केले पाहिजे.

त्यानंतर ११:०० सुमारास हैद्राबादचे दुसरे कव्वाल गायला बसले. त्यांनी श्रीमाताजी शक्ती का भंडार तेरी जयजयकार ही कव्वाली सादर करताना अनेक शेर शायरी करीत सर्वांना नाचविले तासभराने कार्यक्रम संपला.

<u>२१.३.२००५</u>

आज श्रीमाताजींचा वाढदिवस तसेच पूजेचा दिवस असल्याने सकाळी ६:०० च्या ध्यानाच्या वेळीच उपस्थिती जाणवत होती. सगळीकडे आनंदी वातावरण झाले होते.त्यानंतर सकाळी ९:३० वा म्युझिक प्रोग्राममध्ये राहूल कुलकर्णी यांनी १२ च्या सुमारास पोवाडा गायला पसायदान झाल्यानंतर कु. भुवनेश केतकर याने ज्ञानेश्वरांच्या पेहरावात कार्यक्रम सादर करून सर्वांना चकित केले. त्यावेळी प्रत्यक्ष ज्ञानेश्वरच स्टेजवर आल्यासारखे वाटले.

संध्याकाळी ७:०० च्या सुमारास स्टेजवरचा पडदा बाजूला झाला आणि स्टेजवरील भव्य डेकोरेशन दृष्टीस पडले. त्यात वरच्या बाजूला मधोमध झुंबर, त्याच्या बाजूला पिवळ्या आणि पोपटी कापडाचा वापर करून आकर्षक डिझाईन केले होते. स्टेजच्या मागच्या बाजूला तशाचप्रकारे कापडांच्या रंगसंगतीचा वापर करून डेकोरेशन केले होते. मधोमध सिंहासन व बाजूला सर्व पूजेची तयारी केली होती.

सुरुवातीला श्रीबागडदे व डॉ आपटे यांनी जय गणराया श्री गणराया हे भजन म्हटले. त्यानंतर स्क्रीनवर मागच्या वर्षीच्या वाढदिवस पूजेची कॅसेट दाखविण्यात आली. त्यानंतर आदल्या दिवशी प्रतिष्ठानमध्ये श्रीमाताजींच्या शयनकक्षात रात्री १२:०० वाजता केक कापण्यात आला होता त्याची सी.डी. दाखविण्यात आली.

९:०० च्या सुमारास श्रीमाताजींचे फटाक्यांच्या आतषबाजीमध्ये स्टेडियममध्ये आगमन झाले.त्यावेळी जनम दिन आया आदिशक्तीका, आगत स्वागत स्वागतम्, ही भजने चालू होती.त्यानंतर दोन सुवासिनींनी श्रीमाताजींना ओवाळले. सर्व जगातील सहजयोग्यांच्या वतीने श्रीमाताजींच्या चरणावर हार अर्पण केला. जमलेल्या २१ मुलांनी श्रीमाताजींच्या चरणांवर फुले वाहिली. त्यावेळी गणेशस्तुती म्हणण्यात आली. त्यानंतर ओटी भरण्याच्या कार्यक्रम झाला. त्यानंतर सर्वांना श्रीमाताजींच्या वाढदिवसाच्या पूजेतील साकार रूपातील दर्शन झाले. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर केक आणण्यात आला. श्रीमाताजींनी पापाजींच्या मदतीने प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात केक कापला. त्यावेळी हॅपी बर्थ डे टू यू हे गीत सर्वजण गात होते. त्यानंतर श्रीमाताजींना पापाजींनी केक भरवला. त्यानंतर आज पापाजींचाही वाढदिवस असल्याने एक केक पापाजींच्या समोर ठेवण्यात आला. पापाजींनी प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात केक कापला. तो त्यांनी श्रीमाताजींना भरवला. त्यानंतर कल्पनादीदी, साधनादीदी, अनुपमादीदी यांनी श्रीमाताजींना व पापाजींना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणांवर महाप्रसाद आणण्यात आला. श्रीमाताजींनी त्याचा स्वीकार केला. आणि उपस्थित असलेल्या सर्व जनसमुदायास अनंत आशीर्वाद दिले. त्यानंतर श्रीमाताजींचे निवासस्थानाकडे प्रस्थान झाले त्यावेळी १०:१५ वाजले होते. त्यानंतर स्टेडियममध्ये अनेक भजने झाली.त्यावेळी सर्व जण आनंदाने नाचत होते. बाहेरच्या बाजूला प्रसादाची व्यवस्था केली होती. यावेळचे स्टेज डेकोरेशन फारच सुंदर झाले होते. ते मुंबईचे प्रशांत, दिपाली व कापसे यांनी केले होते. आदिशक्तीच्या प्रत्यक्ष साकार रूपातील दर्शनाचा लाभ मिळाल्याच्या आनंदात सर्व जण आपल्या परतीच्या वाटेकडे जायला निघाले

● ● ●

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

# शिव पूजा







# मुझिक प्रोग्राम







